**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)**

क्र.पोमसं/८-अ/रिक्त पदे/लघुलेखक/२२२/२०११ मुंबई. दि. २८/७/२०१७

वाचा :- १. गृह विभाग, शासन निर्णय, क्र.एमआयएस-०४१२/प्र.क्र.२८४/ पुर्नबांधणी क्र.१५/पोल-५ब, दि.१६/१२/२०१६.
२. या कार्यालयाचे समक्रमांक ज्ञापन दि.१६/१/२०१७.
३. या कार्यालयाचे समक्रमांक पत्र दि.१७/१/२०१७.

**-: आदेश :-**

शासनाने गृह विभाग निर्णय क्र.एमआयएस-०४१२/प्र.क्र. २८४/पुर्नबांधणी क्र. १५/पोल-५ब, दिनांक १६/१२/२०१६ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मुफसल लिपिक सवंर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक व स्वीय सहायक या सवंर्गातील साखळी त्रिमीती पदांमधील एकूण १३ पदे "लघुटंकलेखक" पदावर श्रेणी अवनत करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर श्रेणीअवनतीमुळे पोलीस महासंचालक यांच्या मुफसल लिपीक संवर्गात लघुटंकलेखकांची एकूण १३ पदे नव्याने निर्माण झालेली आहेत. सदर १३ पदांपैकी ७ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. तसेच शासनाने प्रस्तुत शासन निर्णयान्वये, वरिष्ट श्रेणी लिपीक पदाची वेतनश्रेणी घेण्याऱ्या कर्मचाऱ्यांना "लघुटंकलेखक" पदासाठी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखनाचे व टंकलेखनाचे अर्हता प्रमाणपत्र धारकांना पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मुफसल लिपिक संवर्गातील खालील नमूद वरिष्ठ श्रेणी लिपिक (अराजपत्रित, गट-क) यांनी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखनाचे व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र सादर केल्याने व सदर पदोन्नतीमुळे त्यांच्या मुळ लिपिक संवर्गातील पदोन्नतीचे लाभ तसेच आश्वासित प्रगती योजनेनुसार लिपिक पदाची वेतनश्रेणी मिळण्याचा हक्क संपुष्टात येणार असल्याबाबतच्या अटी व शर्ती मान्य केल्याबाबत लेखी बंधपत्र सादर केल्याने, त्यांना कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून, लघुटंकलेखक (अराजपत्रित, गट-क) या पदावर पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीवर त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | वरिष्ठ श्रेणी लिपिकाचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील / नियुक्तीचे कार्यालय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती जयश्री महावीर पाचोरे. | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे. | रिक्त पदात |
| २ | श्री.संतोष पुंडलिक सोनोने. | विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती. | पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. | रिक्त पदात |
| ३ | श्री.विनोद लिलाधर मोरे. | संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक | प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक | रिक्त पदात |
| ४ | श्री.बापू नामदेवराव सपकाळ. | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक | विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. | रिक्त पदात |
| ५ | श्रीमती वर्षा कृष्णराव बागले | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे | संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक | रिक्त पदात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | श्री.राजेश विश्वनाथ गांगुर्डे. | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई. | संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक. | रिक्त पदात |
| ७ | श्री.नंदलाल शिवदास माने. | विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर | विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर | रिक्त पदात |

डॉ.प्रज्ञा सरवदे
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई / नागपूर परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र / अमरावती परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र.
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

२. "वरिष्ठ श्रेणी लिपिक" व "लघुटंकलेखक" या दोन्ही पदाची वेतनश्रेणी व ग्रेड पे समान असल्याने. "लघुटंकलेखक" पदावर पदोन्नती दिल्यानंतर संबंधितांची म.ना.से. (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११(१) नुसार विकल्पानुसार वेतननिश्चिती करण्यात येईल, अशी या कार्यालयाची धारणा असल्याचे संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे. याबाबत शासनाकडून अद्याप कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तरी, त्याबाबत शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर "लघुटंकलेखक" पदात विकल्पानुसार वेतननिश्चिती करण्याची पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

३. उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीकांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, न्यायालयाने पदोन्नतीसाठी आक्षेप नोंदविलेला असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर एखादी शिक्षा भोगत असतील तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पहावी.

४. संबंधीत घटक प्रमुखांनी उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपीकांविरुध्द वरीलप्रमाणे काहीच प्रलंबीत नसेल तर, पदोन्नतीवर पर्यायी वरिष्ठ श्रेणी लिपीकांची वाट न पाहता, नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे, आणि त्याप्रमाणे या कार्यालयास कळवावे. संबंधीत घटक प्रमुखांनी कोणत्याही परिस्थितीत संबंधीतांना कार्यमुक्त न केल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक कार्यालयाची राहील.

५. वरील नमुद वरिष्ठ श्रेणी लिपीक हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा अर्ज ७ दिवसांचे आत (दिनांक २६/७/२०१७ पर्यत ) घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना दिनांक २६/०७/२०१७ रोजी न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६.	पदोन्नती आदेशानंतर संबंधीत वरिष्ठ श्रेणी लिपीक यांनी रुग्ण निवदेन केल्यास अथवा गैरहजर राहिल्यास त्यांना रुग्ण निवदेनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजवावा.

७.	उपरोक्त वरिष्ठ श्रेणी लिपिक यांनी लघुटंकलेखक पदावरील पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून त्यांची सध्याची वरिष्ठ श्रेणी लिपिक पदाच्या सेवाज्येष्ठता यादीतील नावे कमी करण्यात यावीत.

प्रत सादर - महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई.

प्रत :

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय.

२.	सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालक यांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १०, १२

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.